# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/2212 /२०१९ पुणे शहर दिनांक 27 /०२/२०१९

पुणे शहरातील वानवडी, लष्कर, स्वारगेट विभागाच्या हद्दीत पुणे सोलापुर रोडवर आझम कॅम्पस ते सोलापुर बाजार परीसरात जोडणारा पादचारी पुल बांधण्याचे काम करण्यात येणार आहे. सदर पुलाच्या कामा करीता गोळीबार मैदान चौकातुन खाण्यामारुती चौकाकडे पुल क्रेनद्वारे घेवुन जाणार आहेत. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी बच्चन सिंह, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, खालील प्रमाणे आवश्यकते नुसार वाहतुकीत बदल करण्यात येत आहे.

दिनांक ०१/०३/२०१९ रोजीचे रात्रौ २३.०० वा पासुन दिनांक ०२/०३/२०१९ रोजी सकाळी ०५.०० वा पर्यंत खालील मार्गावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळवण्यात येत आहे.

- कोंढव्याकडुन येणा-या वाहनांना सीडीओ चौकातुन गोळीबार मैदान चौकाकडे जाण्यास बंदी करण्यात येत आहे.
  पर्यायी मार्ग - साडीओ चौकातुन डाव्याबाजुस वळुन गिरिधर भवन चौकातुन ईच्छितस्थळी जावे.
- पुणे सोलापुर रोडने मम्मादेवी चौकाकडे जाणा-या सोलापुर बाजार चौकातुन पुढे जाण्यास बंदी करण्यात येत आहे.
  पर्यायी मार्ग - सोलापुर बाजार चौकातुन डावीकडे वळुन नेपीअर रोडने खटाव बंगला चौक जवीकडे वळुन साडीओ चौकातुन डाव्या बाजुस वळुन गिरिधर भवन चौकातुन ईच्छितस्थळी जावे.
- शंकरशेठ रोडने गोळीबार चौकात येणा-या वाहनांना धोबाघाट चौकाच्या पुढे येण्या दरम्यानचा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे.
  पर्यायी मार्ग - सेव्हन लव्हज चौकातुन डाव्या बाजुस वळुन ईच्छितस्थळी जावे.

दिनांक ०२/०३/२०१९ रोजीचे रात्रौ २३.०० वा पासुन दिनांक ०३/०३/२०१९ रोजी सकाळी ०५.०० वा पर्यंत खालील मार्गावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळवण्यात येत आहे.

- शंकरशेठ रोडने गोळीबार चौकात येणा-या वाहनांना डावीकडे खाण्यामारुती चौकाकडे जाण्या दरम्यानचा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे.
- पर्यायी मार्ग - गोळीबार चौकातुन उजव्या बाजुस वळुन सीडीओ चौकातुन सरळ लुल्लानगर चौकातुन डावीकडे वळुन नेताजीनगर मार्गे भैरोबानाला चौकातुन पुढे ईच्छितस्थळी जावे.

तरी वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.